# जाहिरात

**बालकांच्या काळजी व संरक्षणाकरिता कार्यरत संस्थाना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक**

महिला व बाल विकास क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्था यांना या जाहिरातीद्वारे कळविण्यात येते की, केंद्र शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५, आणि या कायद्याच्या अमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ लागू केलेले आहेत.या कायद्याच्या कलम ४१(१) अंतर्गत विधीसंघर्षग्रस्त आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकासाठी कार्यरत व इच्छूक असणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्था यांनी या महिला व बालविकास विभागाअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.नोंदणीप्रमाणपत्राशिवाय ज्या संस्था बालकांच्या काळजी व संरक्षणासाठी कार्यरत रहातील अशा अवैद्य संस्थावर या कायद्याच्या कलम ४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.सदर गुन्हयासाठी कमाल १ वर्षापर्यन्त तुरंगवास व रु.१ लाखापर्यन्त दंड अथवा दोन्ही शिक्षा देण्याची तरतुद अधिनियमात नमुद करण्यात आली आहे. बालकांच्या काळजी व संरक्षणकरिता कार्यरत (निरीक्षणगृह, विशेषगृह, सुरक्षित जागा(Place of safety) बालगृह,खुले निवारागृह,विशेष दत्तक संस्था ) तसेच इच्छुक सर्व संस्थानी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ मधील कलम ४१ नुसार नोंदणी प्रमाणपत्राचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ नमुना २७ (नियम २२ (२)आणि २३(२)) नुसार विहित नमुन्यामध्ये अर्ज On-line पध्दतीने **https://womenchild.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर बातम्या आणि सूचना विभागा अंतर्गत / under News and Notifications) दिनांक **२०/५/२०१८** पर्यन्त सादर करावेत. सदर कालावधीनंतर नोंदणीप्रमाणपत्राशिवाय किंवा नोंदणीप्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर न करणाऱ्या काळजी व संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या संस्थावर कायद्याच्या कलम ४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत कारवाई करण्यात येईल.ज्या स्वयंसेवी संस्थांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारित अधिनियम २००६ नुसार नोंदणीप्रमाणपत्र देण्यात आलेले आहे परंतु मुदत संपलेली नाही किंवा नोदणीप्रमाणपत्रावर मुदत नमुद नाही अशा संस्थानी देखिल बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५, आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ नुसार नोदणीप्रमाणपत्रासाठी प्रस्ताव दिनांक २०/५/२०१८ पर्यन्त on-line अर्ज सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा त्याची मान्यता रद्द करण्यात येईल. तसेच यापूर्वि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण )अधिनियम २०१५ व केंद्र शासनाची आदर्श नियमावली २०१६ नुसार नोंदणीप्रमाण पत्रासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचेमार्फत सादर करण्यात आलेले प्रस्ताव व्यपगत करण्यात येत आहेत.सदर संस्थेनी देखिल आता on-line अर्ज सादर करणे आवश्यक आहे. संस्थानी त्यांचे अर्ज on- line सादर केल्यानंतर त्या अर्जाची प्रिन्ट काढून व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्राची सांक्षांकित छायांकित प्रत बंद लखोटयात आयुक्त,महिला व बालविकास आयुक्तालय,२८ राणीचा बाग जुना सर्किट हाऊस पुणे १ या पत्यावर दिनांक २३/५/२०१८पर्यन्त सादर करावेत. नोंदणी प्रमाणपत्रासाठी on- line अर्ज करण्यापूर्वि संस्थानी निती आयोगाच्या Darpan Portal वर संस्थेची संपूर्ण माहिती देणे बंधनकारक राहिल.निती आयोगाच्या Darpan Portal नोंदणी नसल्यास केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहित.

आयुक्त,
महिला व बालविकास
महाराष्ट्र राज्य पुणे-१यांचे करिता